म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय बा.वा.
दा. क्र. ४५०९


# शेर्पा तेनसिंग

BVBK-0404509

...ताचा विजयी गिर्यारोहक ★

# शेर्पा तेनसिंग

. ग्रं. सं. ठाणे





: सर एडमंड हिलरी :    : शेर्पा तेनसिंग नोर्के :

एव्हरेस्ट जिंकून आल्यानंतर काठमांडूपासून ४५ मैलांवरील **दुलाघाट** येथें सकाळची न्याहारी

# शेर्पा तेनसिंग



: लेखक :
पु. रा. बेहेरे

मूल्य ४ आणे

जयहिंद प्रकाशन
ठाकुरद्वार-मुंबई २

BVBK-0404509
मुं. वाचनालय शाखा
नों. दि.

: मुद्रक :

ज. द्रि. देसाई
राष्ट्रवैभव प्रेस
गिरगांव : मुंबई ४

● ● ●

: प्रकाशक :

ग. का. रायकर
झावबाची वाडी
मुंबई नंबर २

● ● ●

: प्रथमावृत्ति :

९ जुलै १९५३

: द्वितीयावृत्ति :

२० जुलै १९५३

● ● ●

: मुखपृष्ठ :

रघुवीर मुळगांवकर
२१५ चर्नी रोड
नवी बिल्डिंग
गिरगांव – मुंबई ४

● ● ●

विक्रेते

जय हिन्द प्रकाशन
झावबाची वाडी
ठाकुरद्वार : मुंबई

## अंगुलीनिर्देश !

जगांतील सर्वोच्च ऐव्हरेस्ट शिखरावर शेर्पा तेन्सिगनें भारताचा ध्वज लावल्यापासून वृत्तपत्रांतून त्याचें नांव सारखें गाजत आहे. दररोज त्याच्या हालचालींची आणि त्याच्या सत्कार-गौरवाची माहिती वर्तमानपत्रांतून व आकाश-वाणीवरून प्रसिद्ध होत आहे. सहाजिक त्याचें विस्तृत जीवनचरित्र जाणण्याची उत्सकता वाचकांना लागलेली असणार. तथापि, वृत्त-पत्रांतून आलेल्या त्रोटक माहितीखेरीज ही उत्सुकता पुरी करण्यास दुसरा मार्ग नव्हता ही अडचण दूर करण्यासाठीं हें पुस्तक आम्ही मुद्दाम प्रसिद्ध करीत आहोंत.

इंग्रजी व हिंदी वृत्तपत्रांतून तेन्सिगविषयीं आलेल्या अनेक लेखांचा, तसेंच तेन्सिगनें आतांपर्यंत ज्यांच्याबरोबर गिर्यारोहण केलें त्या पाश्चात्य गिर्यारोहकांनीं प्रसिद्ध केलेल्या आठ-वणींचा तसेंच खुद्द तेन्सिगनें वेळोवेळीं दिलेल्या मुलाखतींचा उपयोग हें चरित्र लिहितांना श्री. वेहेरे यांनीं भरपूर प्रमाणांत केला आहे. त्यामुळें हें चरित्र शक्य तितकें साधार आणि सप्रमाण झालें आहे हें वाचकांना दिसून येईल.

आपल्या विजयानें आणि पराक्रमानें तेन्सिग हा एक आदर्श भारतीय झाला आहे. त्याचें हें चरित्र वाचकांना आवडेल व स्फूर्तिदायक होईल अशी आशा आहे.

आमच्या अनेक मित्रांनीं तेन्सिगचीं निर-निराळीं छायाचित्रें तत्परतेनें देऊन पुस्तकाचें सौंदर्य वाढविण्यास साह्य केलें याबद्दल आम्ही त्यांचे फारफार आभारी आहोंत.

—ग. का. रायकर



## ❀ तेजस्वी ताऱ्याचा उदय ❀

एकोणतीस मे १९५३ या दिवशीं भारताला एका नव्या राष्ट्र-वीराचा शोध लागला. जगाला एका साहसीश्रेष्ठाची ओळख पटली. शेर्पा तेन्सिंग नोर्के या वीरानें त्या दिवशीं जगांतील सर्वोच्च शिखरावर—हिमालयानें धारण केलेल्या रुपेरी मुकुटावर—भारताचा आणि नेपाळचा ध्वज लावला. जगांत एकच वार्ता फांकली: 'तेन्सिंगनें एव्हरेस्ट जिंकलें !'

रात्रीच्या वेळीं आकाशांत अकस्मात् एकादा अतितेजस्वी तारा उदय पावावा आणि त्यामुळें सर्वत्र प्रकाश पडावा, तसा गिर्यारोहक

जगांत तेन्सिंगचा उदय झाला आहे असें लोकांना वाटूं लागलें. तेन्सिंगनें मिळविलेल्या विजयाच्या दीप्तीनें लोकांचे डोळे दिपले आहेत. त्याच्यावर पदव्यांचा पाऊस पडत आहे; सन्मानांचा वर्षाव होत आहे, त्याच्या पायाशीं देणग्यांचा खच पडत आहे.

या पराक्रमी पुरुषाला एकदां डोळे भरून पहावा म्हणून लोक उत्सुक झाले आहेत. तेन्सिंग दिल्लींत आला त्यावेळीं तर लोकांनीं त्याला अक्षरश: डोक्यावरच घेतलें. पण यांत आश्चर्य नाहीं. तेन्सिंगनें एव्हरेस्ट गांठलें ही वातमी हरद्वारला पसरली तेव्हां जगाच्या उलाढालींपासून अलिप्त राहून आपल्या ध्यानधारणेंत निमग्न असणारे साधुवैरागीसुद्धां स्तिमित झाले, त्यांनींहि तेन्सिंगच्याच विजयाची चर्चा सुरू केली, असें एका लेखकानें लिहिलें आहे.

## राष्ट्राची उंची : तेन्सिंग : २ :

तेन्सिंगनें कांहींतरी अद्वितीय केलें अशी लोकांची भावना झाली आहे म्हणूनच त्याच्याबद्दल हें अमूप कुतूहल निर्माण झालें आहे. तेन्सिंगनें एव्हरेस्ट गांठलें; ज्या ठिकाणीं पोंचण्यासाठीं आतांपर्यंत अनेक वीरांनीं जंग जंग पछाडलें; कित्येकांनीं आपल्या पंचप्राणांची ओंजळ वाहिली; पण त्यांचे हे सारे प्रयत्न अयशस्वी झाले तेथें तेन्सिंग विजयी झाला. ही त्याची कामगिरी अलौकिक आहे ही गोष्ट खरीच. पण त्याचें यश अलौकिक आहे तशीच त्याची चिकाटी आणि साहस असामान्य आहे. आणि त्यांचेंच खरें महत्त्व आहे.

असाध्य तें साध्य करण्यासाठीं धडपडत रहाणें ही मानवाच्या प्रगतीची गुरुकिल्ली आहे. ही धडपड करीत असतांना तो क्षुद्र फायद्याकडे पहात नाहीं; त्या प्रयत्नांत त्याला आंतरीक समाधान लाभतें. त्याचें साहस, धाडस, शौर्य या प्रयत्नांत उजळून निघतें.

अशीं माणसें हा त्या राष्ट्राचा कस असतो. राष्ट्राची थोरवी अशीं माणसें मोजून ठरवावी लागते. तेन्सिंगचें महत्त्व हें आहे.

निसर्गावर मात करायची; तो ज्या ठिकाणीं येऊं देत नाहीं त्या ठिकाणीं हट्टानें प्रवेश करायचा या विजयिष्णु वृत्तींतून पाश्चात्यांची गिर्यारोहणाची कल्पना निघाली आहे. भारतांत पूर्वीं गिर्यारोहण होतें; पण त्याचें स्वरूप धार्मिक होतें.

भारताच्या उत्तरेला पसरलेला नगाधिराज हिमालय हें देवतांचें वस्तीस्थान आहे असें पूर्वीपासून मानलें जातें. विशेषत: हिमालयाचा शंकराशीं घनदाट संबंध आहे. पर्वत–माथ्याशिवाय महादेवाचें अन्य वस्तीस्थानच नाहीं. हिमालयच काय पण इतर डोंगर पर्वतांना आणि त्यांच्या शिखरांना ईश्वराचींच नामाभिधानें देण्यांत आलेलीं आहेत. हिमालय म्हटला कीं कैलास आठवतो. रुद्रानें ज्या ठिकाणीं सतीच्या प्रेमासाठीं दक्षयज्ञाचा विध्वंस केला त्या कनखल क्षेत्राचें स्मरण होतें.

एव्हरेस्ट शिखरावर गौरीशंकराचा निवास आहे म्हणून मनुष्याला तेथें पोंचतां येत नाहीं अशी अनेकांची भोळी भावना होती.

हिमालयावर मान उंच करून असलेलीं अनेक शिखरें आहेत. गौरीशंकर, कांचनगंगा अशा काव्यमय नांवानीं तीं ओळखलीं जातात. आणि आमच्या पूर्वजांच्या उदात्त बुद्धीचेंहि आम्हाला स्मरण करून देतात. या अनेक शिखरांपैकीं ‘एव्हरेस्ट’ हें शिखर सर्वांत अधिक उंच; पण त्याचें नांव खटकणारें आहे. पण हें नांव त्याला अगदीं अलिकडे देण्यांत आलें आहे.

## सर्वोच्च शिखराचीं नामांतरें : २ :

या शिखराचें पौराणिक नांव ‘नौकाबंधन’ आहे असा कांहीं लोक दावा करतात. पृथ्वीप्रलय झाला तेव्हां मनूनें वाढविलेला मासा

त्याच्याकडे आला आणि मनूनें आपल्या नौकेच्या दोरखंडाची गांठ त्या माशाच्या शिंगाला बांधली. मनूला प्रलयांतून वांचविण्यासाठीं त्या माशानें मनूची नौका हिमालयाच्या अत्युच्च शिखरावर नेऊन बांधली अशी कथाहि सांगण्यांत येते.

या शिखराचेंच नांव ' गौरीशंकर ' हा गैरसमज बराच दृढ आहे. वस्तुत: गौरीशंकर हें दुसरें शिखर आहे. एव्हरेस्टपासून तें ५५ मैल अंतरावर आहे. शिवाय त्याची उंची एव्हरेस्टपेक्षां बरीच कमी आहे. असें असलें तरी एव्हरेस्टचीं पुरातन नांवें प्रचलित आहेत.

हिमालयाची गणना आपण भारतांत करीत असलों आणि म्हणूनच एव्हरेस्ट शिखरहि भारतीयच समजत असलों तरी आज तो भाग भारत सरकारच्या अधिकारक्षेत्रांत नाहीं. नेपाळ आणि तिबेट या दोघांना वेगळें राखून आणि त्यांच्यावर नजर ठेवून हें शिखर खडें आहे. आणि या भूमींतील लोकांनीं या शिखराचें पुरातन कालींच नामकरण करून ठेवलें आहे.

## हिमालयाचीं शिखरें

भारताच्या उत्तरेस पाकिस्तानापासून नेपाळ, तिबेट, चीनपर्यंत पसरलेला हिमालय पर्वत जसा उत्तुंग आहे तसा विस्तृत व प्रचंडहि आहे. त्याच्या अनेक रांगा असून त्याचीं अनेक शिखरें आहेत. यांपैकीं बहुतेक शिखरें अजिंक्य व दुर्लंघ्य आहेत. यांपैकीं फारच थोड्या शिखरांवर आतांपर्यंत धाडसी प्रवासी जाऊन पोहोंचले आहेत. त्या शिखरांची नांवें व उंची खालीलप्रमाणें आहे.

| शिखर | फूट |
|---|---|
| एव्हरेस्ट | २९ १४१ |
| गॉडविन ऑस्टिन | २८,२५४ |
| कांचनगंगा | २८,१४६ |
| धवलगिरी | २६,८२६ |
| नंगा पर्वत | २६,६२९ |
| अन्नपूर्णा | २६,४९२ |
| नंदादेवी | २५,६४५ |
| कामेट | २५,४४७ |
| पंचशूली | २३,६५० |
| गौरीशंकर | २३,४४० |
| त्रिशूळ | २३,०६० |
| कैलास | २२,०२८ |

तिबेटी लोक त्याला ‘ चोमोलुंगमा ’ म्हणजे ‘ जगाची मातृदेवता ’ असें म्हणतात. नेपाळी लोक त्याला ‘ स्वर्गमाथा ’ म्हणतात. असें असूनहि ‘ एव्हरेस्ट ’ हें नांव कसें रूढ झालें ?

## राधानाथ सिकदर यांचा शोध : ४ :

हिंदुस्थान ब्रिटिशांच्या ताब्यांत आल्यानंतर त्यांनीं या देशाच्या भूभागाची शास्त्रीय मोजणी करण्यास प्रारंभ केला. त्यासाठीं ‘ सर्व्हे ऑफ् इंडिया ’ म्हणून एक खातेंच निर्माण केलें. या खात्यातर्फे निरनिराळ्या प्रदेशांचा उंचसखलपणाहि निश्चित केला जात असे. मोजणीचाच तो भाग होता. १८४९ सालीं खात्यातर्फे हिमालयाच्या शिखरांची मोजणी सुरू झाली.



: एव्हरेस्ट शिखर :

‘या मोजणींत एका ‘ अज्ञात ’

शिखराचा शोध लागला.' म्हणजे या शिखराचें नांव मोजणीदारांना माहीत नव्हतें. त्यांनीं आपल्या मोजणी-आलेखावर हें शिखर नमूद करून त्याला 'शिखर १५' असें नांव दिलें. निरनिराळ्या तऱ्हेनें शिखराची पहाणी करून त्याची माहिती नमूद करून ठेवण्यांत आली.

या माहितीच्या आधारें १८५२ सालीं खात्याचे चीफ् कॉम्प्यूटर श्री. राधानाथ सिकदर यांनीं या शिखराची उंची निश्चित केली. राधानाथ हे मोठे गणिती होते. न्यूटनच्या 'प्रिन्सिपिआ' ग्रंथाचें अध्ययन करणारे ते पहिले भारतीय होते. 'राधानाथेर आत्मकथा' या नांवाचें आत्मचरित्रहि त्यांनीं बंगाली भाषेंत लिहिलें आहे.


राधानाथांनीं या शिखराची उंची निश्चित केली तेव्हां ते स्वत: हर्षातिरेकानें नाचूं लागले. कारण जगांतील सर्व पर्वतशिखरांची उंची त्यांना माहीत होतीं आणि म्हणून हें शिखर सर्वोच्च आहे हें त्यांच्या तावडतोब लक्षांत आलें. लगेच सर्व्हेअर-जनरल कर्नल सर ॲन्ड्रु वॉघ यांच्या खोलींत जाऊन ते म्हणाले, 'मी जगांतील सर्वोच्च शिखर शोधून काढलें आहे.' राधानाथांनीं या शिखराची उंची २९००२ फूट निश्चित केली होती.

राधानाथांनीं हें शिखर शोधलें आणि कर्नल वॉघ यांनीं त्याचें नामकरण केलें. त्यांच्या पूर्वींचे सर्व्हेअर–जनरल सर जॉर्ज एव्हरेस्ट यांचेंच नांव त्यांनीं त्या शिखराला दिलें. या शिखराला राधानाथ यांचें नांव द्यावें अशी चळवळ अलीकडे बंगाली लोकांनीं सुरू केली आहे. ३१ डिसेंबर १९५१ रोजीं निखिल भारत वंग साहित्य संमेलनाच्या पाटणा येथील अधिवेशनांत या अर्थाचा एक ठरावहि संमत झाला आहे.

'देवतात्मा' हिमालयाच्या शिखरावर एकाद्या व्यक्तीचें नांव बसावें आणि त्यांतहि तें साहेबाचें असावें ही गोष्ट मनाला कशीशीच वाटते हें मात्र खरें!

या शिखरावर चढून जाण्याची कल्पना प्रथम सर फ्रान्सिस यंग हस्बंड यांच्या डोक्यांत आली. त्यासाठीं १८९३ सालींच त्यांनीं एव्हरेस्ट–आरोहणाची एक योजना तयार केली. पण योजना आंखण्यापेक्षां ती अंमलांत आणणें कठीण होतें. सर फ्रान्सिस यांनीं १९०८ सालापर्यंत खूप प्रयत्न केले. पण ते अनेक राजकीय उलथापालथींमुळें सफल होऊं शकले नाहींत. पुढें थोड्याच वर्षांत पहिलें महायुद्ध सुरू झालें आणि ही योजना तशीच पडून राहिली.

अखेर एव्हरेस्टवर पहिली चढाई करण्याचा मान १९२१ सालीं कर्नल सी. के. हॉवर्ड ब्युरी यांच्या तुकडीला मिळाला. या तुकडींतील एक स्कॉटिश गिर्यारोहक डॉ.केलॉस सुरवातीलाच हृद्याच्या विकारानें मृत्यु पावले. तथापि, उत्तर आणि पूर्व बाजूंनीं एव्हरेस्टवर जाण्याचे मार्ग शोधण्याची कोशीस या तुकडीनें केली. पण त्यांना हार खाऊन परत फिरावें लागलें.


: कॅ. ब्रुस :

पुढच्याच वर्षीं कॅ. ब्रुस आणि फिंच यांच्या तुकडीनें चढाई केली. आणि ते दोघे २७३०० फुटांपर्यंत चढून गेले. पण एवढ्यानें त्यांचें समाधान झालें नाहीं. खालीं तळावर विश्रांति घेऊन ते पुन्हा शिखर चढूं लागले. यावेळीं हिमपातानें त्यांच्याबरोबर असलेले सात शेर्पा मृत्युमुखीं पडले. त्यामुळें ही तुकडी माघारीं आली.

१९२४ सालीं एव्हरेस्ट कोपला होता कीं काय समजत नाहीं. या वर्षीं त्याच्यावर दोन चढाया झाल्या. दोन्ही चढाया पराभूत करून एव्हरेस्टनें त्यांतील कांहीं वीरांचे बळी घेतले. तिसरी चढाई कर्नल नॉर्टन यांनीं केली. या चढाईच्या पहिल्याच सप्ताहांत एक गुरखा मेंदू फुटून मृत्यू पावला; दुसरा एक शेर्पा थंडीच्या कडाक्यानें गारठून मरण पावला. तरीहि कर्नल नॉर्टन पुढें चढतच राहिले. त्यांनीं २८,१२६ फुटांचा टप्पा गांठला.

चौथी चढाई जॉर्ज एल्. मॅलोरी यांनीं याच वर्षीं केली. मॅलोरी यांनीं पहिल्या दोन चढायांत भाग घेतला होता. त्यांच्या या तिसऱ्या चढाईत ए. सी. आयर्विन हे त्यांचे साथीदार होते. हे दोघे बहाद्दर २८,२१५ फूट चढले एवढें दिसलें. पुढें ते दाट धुक्यांत विलीन झाले आणि पुन्हां दिसलेच नाहींत! आठ वर्षांनीं ते अदृश्य झाले होते त्या ठिकाणाच्या जवळपास त्यांचा बर्फ कापण्याचा परशु सांपडला. एवढीच त्यांची खूण.

एव्हरेस्टच्या या रौद्ररूप दर्शनानें गिर्यारोहकांच्या त्याच्यावरील चढाया पुढें आठ वर्षें थंड पडल्या. १९३३ सालीं दोन प्रयत्न झाले. पहिला प्रयत्न गिर्यारोहणाचा नव्हता तर विमानोड्डाणाचा होता.

इंग्लंडमधील धनत्तर महिला मिसेस हुस्टन हिनें विमानोड्डाणाचा सर्व खर्च करण्याचें ठरविलें. आणि लेफ्ट. कर्नल लेकर यांच्या विमानानें ३ एप्रिल १९३३ रोजीं ३० ते ३३ हजार फूट उंचीवर उड्डाण केलें. हें उड्डाण म्हणजे एका अर्थीं मृत्यूला आलिंगनच होतें. पण कडाक्याच्या थंडीचें निवारण करण्यासाठीं विशेष तऱ्हेचा पोषाक बनविलेला होता, इतकेंच नव्हे तर त्यांत उष्णता कायम राखण्यासाठीं विद्युत्–यंत्रहि बसविलें होतें.

पांचवी चढाई याच वर्षीं ह्यज रट्लज यांच्या तुकडीनें केली. पण हे गिर्यारोहक २८,००० फूटच चढून परत आले.

●

गिर्यारोहणाचे हे पराक्रम परकी लोकांनीं केले आहेत. गिर्यारोहणाच्या क्षेत्रांत भारतीयांचें स्थान काय? पाश्चात्य सुशिक्षित लोक ज्या ज्ञानलालसेनें हे प्रयत्न करतात त्या तऱ्हेनें या क्षेत्रांत भारतीयांनीं अलिकडेच पदार्पण केलें आहे. निकोरे, पिलानी, शारदा अग्रवाल या तरुणांनीं पंचशुली शिखरावर दोनदां चढण्याचे प्रयत्न केले. नुकतेच ते विजयी झाले.

भारत तिबेट सरहद्दीवर असलेल्या कामेट शिखरावर मे. जयाल, लेफ्ट. जोहोरी आणि गुरूदयाळसिंह यांनीं गेल्या वर्षीं चढाई केली होती. यंदा नुकतेच दुसऱ्या चढाईत ते यशस्वी झाले आहेत.


पण गिर्यारोहणाच्या क्षेत्रांत गुरखा आणि विशेषत: शेर्पा वीरांचा पराक्रम अद्वितीय आहे. हे लोक अशिक्षित आणि दरिद्री असल्यामुळें त्यांचा पराक्रम त्यांना हमाल म्हणून नोकरीला ठेवणाऱ्या पाश्चात्य गिर्यारोहकांच्याच खात्याला जमा होत आला.

## हिमालयावरील स्वाऱ्या

हिमालयाच्या निरनिराळ्या शिखरांवर आरोहण करण्यासाठीं आतांपर्यंत ब्रिटिश, स्विस, फ्रेंच व जपानी पथकांनीं प्रयत्न केले. पण एव्हरेस्ट काबीज करण्यासाठीं झाल्या तितक्या स्वाऱ्या दुसऱ्या कोणत्याहि गिरिशिखरासाठीं झाल्या नाहींत. त्याचें कारण एव्हरेस्ट हा सर्वांत दुर्गम आहे. एव्हरेस्टसाठीं झालेल्या मुख्य मोहिमा खालीलप्रमाणें.

| | | |
|---|---|---|
| १९२१ | ब्रिटिश कर्नल बुरी | २३,००० |
| १९२२ | ,, ब्रिगेडियर ब्रूस | २७,३०० |
| १९२४ | ,, लेफ्ट.कर्नल नॉर्टन | २८,१०० |
| १९३३ | ,, ह्यू रटलेज | ,, |
| १९३५ | ,, एरिक शिप्टन | २३,००० |
| १९३६ | ,, रटलेज | ,, |
| १९३८ | ,, टिलमन | २७,३०० |
| १९५१ | ,, शिप्टन | २०,६०० |
| १९५२ | स्विस लँबर्ट व तेन्सिंग | २८,२९० |
| | ,, शेव्हॅली | २६,५७५ |
| १९५३ मे २९ | ब्रिटिश कर्नल हंट, तेनसिंग-हिलरी | २९,१४१ |

बर्फाचा मारा आणि सोसाट्याचा वारा यांना तोंड देत आणि अवजड सामान पाठीवर घेऊन बिकट वाटा लीलेनें चढून जाणारे शेर्पा धन्य होत. अज्ञात पर्वतावर ते नव्या नव्या वाटा शोधून काढतात आणि गिर्यारोहकांना मार्गदर्शन करतात.



: धन्य ते शेर्पा :

शेर्पांच्या धैर्याची आणि चिकाटीची कसोटी ते जेव्हां बर्फाचे कडे चढून जातात तेव्हां होते. बर्फावर पाय टिकणें अशक्य होतें तेव्हां हातांतील परशूनें बर्फांत ते पाय ठेवण्याइतकी जागा बर्फ कापून तयार करतात. अशा तऱ्हेनें ते पुढें चालतात; गिर्यारोहक त्यांच्या मागून जातो. एकाद्या ठिकाणीं बर्फांत खिळा ठोकून त्याला ते दोरखंड बांधतात आणि गिर्यारोहकाला वर खेंचून घेतात. गिर्यारोहणाच्या विक्रमाचें श्रेय खरोखर या शेर्पांचेंच आहे.

दार्जिलिंगमध्यें रहाणाऱ्या या शेर्पांनीं आतांपर्यंत अनेकदां गिर्यारोहणांत आपले प्राण दिले आहेत. तेन्सिंग हें त्यांच्या पुण्याईचें विकसित पुष्प आहे. आपलीं बायकामुलें दूर ठेवून बर्फाच्या कडेकपारींत विक्रम करणारे शेर्पा आपल्या पराक्रमाचा गर्व वहात नाहींत. ते स्वतःच नव्हेत, तर त्यांचीं बायकामुलेंहि त्यांचे हे पराक्रम म्हणजे त्यांचें अनिवार्य कर्तव्य समजतात.

अशा जन्मजात गिर्यारोहक शेर्पा जमातींत तेन्सिंग नोर्केचा जन्म झाला.

[library stamp] ८०६

## तेन्सिगचा घराला रामराम !

पूर्व नेपाळमध्यें सोलोखुंत्रो या खेड्यांत १९१४ सालीं तेन्सिंगचा जन्म झाला. त्याच्या पित्याचें नांव मिगा असें होतें. दोन वर्षांपूर्वीच त्यांचें देहावसान झालें. तेन्सिंगच्या आईचें नांव किंगिअमा. ती आतां नेपाळांतच रहाते. तेन्सिंगला दोन भाऊ होते पण ते वारले. त्याच्या एका बहिणीचें लग्न तिबेटमधील रोम्बुक येथील बौद्ध मठाच्या एका भिक्षूशीं झालें आहे. दुसरी बहीण नेपाळांत आई-बरोबर असते.

तेन्सिंगचें घराणें लढवय्याचें आहे. तेन्सिंग चार वर्षांचा होईपर्यंत पहिलें महायुद्ध सुरू होतें. त्याच्या कुळांतले, खेड्यांतले अनेक पुरुष महायुद्धावर गेले होते. महायुद्ध संपल्यानंतर तेन्सिंगचे वडील दार्जिलिंगमध्यें येऊन दाखल झाले. नेपाळमधील शेर्पा पोट भरण्यासाठीं बंगालमधील दार्जिलिंग जिल्ह्यांत येऊन रहातात. या थंड हवेच्या ठिकाणीं हमाली किंवा इतर अंगमेहनतीची कामें करून ते पोट भरतात. तेन्सिंगच्या वडिलांनीं तोच मार्ग स्वीकारला होता.

तेन्सिंगचे वडील दरिद्री होते. त्यामुळें इच्छा असती तरीहि तेन्सिंगला शिक्षण देणें कठीणच गेलें असतें. त्यामुळें मनमानेल तसें गिरिकंदरांत भटकणें हाच छोट्या तेन्सिंगचा एक उद्योग बनला. बालपणींच्या या स्वच्छंद गिरीविहारामुळें तेन्सिंगचें मन पर्वतासक्त बनलें. तो पर्वतावर रमूं लागला.

तेन्सिंग बारा तेरा वर्षांचा झाला. वयाबरोबर त्याचें गिर्यारोहणाचें प्रेम वाढत चाललें. घरीं दुसरा उद्योग नव्हता. आणि घरीं राहून त्याची पर्वतावर चढण्याची हौसहि भागण्यासारखी नव्हती. म्हणून एक दिवस त्यानें घराला राम राम ठोकला आणि ही स्वारी दार्जिलिंगमध्यें एका गिर्यारोहकांच्या तुकडींत हमाल म्हणून सामील झाली.

ही तुकडी सिक्कीमला जात होती. आवडीचें गिर्यारोहण आणि पोट भरण्याचें साधन तेन्सिंगला एकदमच प्राप्त झालें.

तेन्सिंग शेर्पानें हमालीचा धंदा पत्करला तो गिर्यारोहणाच्या प्रेमानेंच. त्यांत हळू हळू त्यानें प्रगति केली आणि दार्जिलिंगजवळ तुंगसुंग वस्ती या भागांत तो १९३३ सालीं स्थायिक झाला. त्यानें



: सहकुटुंब सहपरिवार :

एका दार्जिलिंग सुंदरीशीं विवाह केला. तिचें नांव अंगलाहम्. त्याला एक मुलगा झाला होता. पण तो अल्पवयांतच मृत्यु पावला. आज त्याचें कुटुंब म्हणजे पेमा आणि निमा या दोन कन्या, त्याची पत्नी आणि केंसाळ तिबेटी कुत्रा खांगर.

## 'हमाला'ची महत्वाकांक्षा आणि तपश्चर्या



हमाल म्हणून तेन्सिगनें आयुष्याला सुरवात केली पण त्याची महत्त्वाकांक्षा मोठी होती. परदेशी लोक कष्ट सोसून येथें येतात आणि प्राणांची पर्वा न करतां उंच उंच चढून जातात. आपण त्यांच्याबरोबर केवळ हमालच रहायचें? या विचारांनीं गिर्यारोहणांतील कसब आत्मसात करण्याचा त्याचा पक्का निश्चय झाला.

पण हमालाचा गिर्यारोहक होणें ही सोपी गोष्ट नव्हती. त्यासाठीं त्याला कडक तपश्चर्या करणें भाग होतें. हमाली करतां करतां त्याला मिळेल तेवढें गिर्यारोहणाचें कसब आत्मसात करणें भाग होतें. हमालाचें काम म्हणजे भारवाहक गाढवासारखें. गिर्यारोहकांचें सामान वहायचें, त्यांचीं भांडीं धुवायचीं, पडेल तें काम करायचें. पण हें करूनच तेन्सिंगला पुढचा पल्ला गांठायचा होता.

पित्याच्या अंगाखांद्यावर त्याचें मूल जितक्या सहजपणें बागडतें तितक्या सहजतेनें तेन्सिग पर्वतांच्या अंगाखांद्यावर चढत असे हें खरें. पण कड्यासारखीं शिखरें चढून जायला याहून अधिक कसब हवें होतें. पैशाच्या किंवा पाठिंब्याच्या अभावीं आधुनिक पद्धतीचें गिर्यारोहणाचें शिक्षण मिळविणें त्याच्या आंवाक्याबाहेर होतें. त्यामुळें स्वावलंबनानें पुराण्या पद्धतीनेंच त्यानें गिर्यारोहणाचें शिक्षण घेण्यास सुरवात केली.

'दि इंडियन हिमालय क्लब' या गिर्यारोहकांच्या संस्थेनें तेन्सिंगला कांहींच मदत केली नाहीं. एकादा शेर्पा लब्धप्रतिष्ठित संस्थेच्या खिजगणतींत कसा येणार? पण यांत आश्चर्य नाहीं. तेन्सिंगनें आपल्या यशाचें सर्वोच्च शिखर गांठीपर्यंत त्याची उपेक्षाच झाली.

हमाली आणि स्वप्रयत्नानें शिक्षण असा दुहेरी उद्योग चालू असतांना १९३५ साल उजाडलें. सुप्रसिद्ध ब्रिटिश गिर्यारोहक एरिक शिप्टन एव्हरेस्टवर चढण्यासाठीं आले आणि त्यांच्याबरोबर तेन्सिंग निघाला. सिक्कीम मार्गे ही तुकडी चालूं लागली. २१ हजार फूट चढून गेल्यावर हे लोक एका प्रेताला अडखळून पडले. शेजारींच ठोकलेल्या तंबूच्या चिंध्या चिंध्या झालेल्या दिसत होत्या. एक दैनंदिनीहि पडलेली होती. प्रेताला अडखळल्यामुळें या लोकांचें धैर्य खचलें नाहीं. ते पुढें चालूं लागले. तें प्रेत १९३४ सालीं लष्करांतून पळून गेलेल्या मॉरिस विल्सन या इंग्रज तरुणाचें होतें. अपुऱ्या तयारीनें एव्हरेस्ट गांठायला निघालेल्या या तरुणाला अर्ध्या वाटेवर मृत्यूनें गांठलें होतें. तेन्सिंग पुढें चालतच होता. एरिक शिप्टनबरोबर त्यानें २४ हजार फूट उंचीपर्यंत मजल मारली.

## तेन्सिगच्या यशाची वाढती कमान : ९ :

पण तेन्सिंग साधा शेर्पा होता; हमाल होता. त्याच्या या विक्रमाकडे लक्ष देणार कोण? पण त्यानें स्वत: लक्ष दिलें. आपल्या सामर्थ्याची त्याला प्रतीति आली. त्याचा आत्मविश्वास दुणावला. त्यानें आपलें शिक्षण जोरानें सुरू केलें. यापुढें एव्हरेस्टवर हमाल म्हणून जायचें नाहीं, असें त्यानें ठरविलें.

तेन्सिंग हमाल असला तरी त्याच्या कौशल्याची आणि अनुभवाची कीर्ति गिर्यारोहक जगांत हळूहळू पसरत होती. कोणतीहि परदेशी तुकडी गिर्यारोहणासाठीं आली कीं ती प्रथम तेन्सिंगचा शोध घेऊं लागली. १९३७ सालीं स्वीस गिर्यारोहक आले. त्यांच्याबरोबर तेन्सिंग, केदारनाथ, सातुपन, वल्वल या भागांत फिरून आला. १९३८ सालीं तो एका इटालियन प्राध्यापकाबरोबर हिमालयाच्या दुर्लंघ्य कडेकपारींत

१४०७९ २७ ०८।८५३

फिरून आला. याच वर्षी त्याच्या गुणांची पारख करणारा एक ‘ समानधर्मा ’ त्याला भेटला.

जगप्रसिद्ध गिर्यारोहक टिलमन यांनीं तेन्सिगची गांठ घेतली. आपल्या तुकडीचा सभासद म्हणून एव्हरेस्टवर येण्याची त्यांनीं तेन्सिंगला विनंति केली. तेन्सिगचें एक स्वप्न साकार झालें. टिलमन बरोबर तेन्सिगनें २६ हजार फुटांची मजल गांठली. त्याच्या यशाची कमान वाढत होती.

या पुढचीं पांच सहा वर्षे तेन्सिंगनें हिमालय हेंच आपलें निवासस्थान केलें होतें असें म्हटलें तरी चालेल. १९३९ सालीं डून स्कूलचे किप्सिग यांचे बरोबर त्यानें बंदरपंच शिखरावर चढाई केली.

## हमाल नव्हे: मार्गदर्शक : १० :

या चढाया आटोपून तेन्सिंग १९४५ सालीं दार्जिलिंगला परत आला. त्याचें अनुभवाचें भांडार भरलें होतें. आरोहणाचें कसब वाढलें होतें. या काळांत त्यानें थोडीबहुत कमाई शिल्लक राखली होती. आपल्या पत्नीबरोबर आणि लाडक्या मुलींबरोबर कांहीं दिवस आरामांत काढावे अशी त्याची इच्छा होती. दार्जिलिंगला राहून तो आतां गिर्यारोहकांचा धंदेवाईक मार्गदर्शक बनला. आणि दार्जिलिंगच्या आसपास तो आपला धंदा चालवूं लागला.

१९४६ सालीं आफ्रिकेंतून आलेल्या गिर्यारोहकांनीं तेन्सिंगला मार्गदर्शक म्हणून आपल्या बरोबर नेलें होतें. त्यावेळीं तो एव्हरेस्टवर २४ हजार फूट चढून गेला. १९४७ सालीं डेनमन बरोबर त्यानें एव्हरेस्टवर चढाई केली; तसेंच तो गंगोत्रीहि चढून गेला.

गिर्यारोहकांच्या तुकडीबरोबर फिरायचें म्हणजे घरापासून दूर रहायचें. या कामावर असेल त्यावेळीं तेन्सिगची प्राप्ति सरासरी दरमहा २२५ रुपये असे. घरीं रहायचें म्हणजे बेकार बसायचें असें असल्यामुळें तेन्सिग आपल्या घराबाहेर अधिक काळ रहायचा.



: पत्नी व मुलींबरोबर आराम :

महायुद्धानंतरच्या काळांत एव्हरेस्टवर जाण्याच्या मार्गांतहि क्रांति झाली. एव्हरेस्ट ज्या हिमालयाच्या मस्तकावर आहे त्याच्या दोन बाजूंना दोन देश आहेत. एक नेपाळ आणि दुसरा तिबेट. एव्हरेस्टकडे जाण्याचे मार्ग या दोनच देशांतून आहेत. १९५० पूर्वीं नेपाळचे दरवाजे परकी लोकांना अगदीं बंद होते. तिबेटचा धर्मगुरु आणि राजा दलाईलामा प्रवाशांना आपल्या देशांतून गिर्यारोहणास परवानगी देत असे. १९५० सालीं ही परिस्थिति याच्या अगदीं

उलट झाली. तिबेट कम्युनिस्ट चीननें जिंकल्यामुळें तेथें परक्यांना प्रवेश बंद झाला. उलट नेपाळनें मात्र गिर्यारोहकांचें स्वागत केलें.

१९४८ सालीं कॅ. बानर्जी आणि १९४९ सालीं धिल्लन रिप्ले यांनीं नेपाळांतून दक्षिण दिशेनें एव्हरेस्टवर चढाई करण्यासाठीं मार्ग शोधून काढण्याचा प्रयत्न केला. १९५० सालीं एरिक शिप्टन यांनीं हा प्रयत्न पुढें चालविला.

१९४८ व १९५० सालीं तेन्सिगनें काश्मीरमध्यें भारतीय सैनिकांना बर्फावरून चालण्याचें शिक्षण दिलें होतें.

१९३८ सालीं तेन्सिगला आपल्या बरोबरीचा साथीदार बनविणारे टिलमन यांच्या बरोबर नंगा पर्वतावर आरोहण करण्याचा प्रयत्न तेन्सिगनें केला. या चढाईंत सातव्या गुरखा पलटणीचे कॅप्टन तंगलु आणि ग्राश या दोन गिर्यारोहकांना अपघाती मृत्यु आला. त्यांचा पाय घसरला आणि ते खालीं कोसळले. त्यामुळें ही चढाई मध्येंच संपवावी लागली.

तेन्सिगची नंदादेवी शिखरावरील चढाईहि स्मरणीय आहे. फ्रेंच गिर्यारोहक डुप्ले यांनीं नंदादेवी शिखरावर आरोहण करण्यासाठीं तेन्सिगला मार्गदर्शक म्हणून नेलें होतें. या चढाईंत डुप्ले यांनीं नंदादेवीच्या पायांवर आपले प्राण समर्पण केले. तेन्सिग मात्र या चढाईंत बचावला. मध्यंतरींच्या काळांत त्यानें चित्रळमधील तिरचीमीर शिखरावरहि आपला मोर्चा वळविला होता.

एव्हरेस्टवर चढाई करण्याचा मोसम वर्षांतून दोनच वेळां येतो. पाऊस सुरू होण्यापूर्वी मे महिन्यांत एकदां आणि दुसऱ्यांदा पाऊस संपल्यानंतर आक्टोबर महिन्यांत. कारण हवामान हा मुख्य प्रश्न असतो. माणसाला सहन होण्यासारखें हवामान वर्षांतून या दोन

स्वर्ग



माउंट एव्हरेस्ट : ‘देवतात्मा’ हिमाल

मा था'



याच्या माथ्यांवर ठेवलेला रुपेरी मुकुट

वेळींच असतें. पण तें किती काळ राहील याचा नियम नसतो. एरव्हीं चक्री वादळें, आणि हिम वादळें शिखरावर एकसारखीं येऊन आदळत असतात. रात्रीच्या वेळीं तंबू अतिशय जपून धरावा लागतो. कारण तंबू जरा ढिला झाला तर वाऱ्याच्या सोसाट्यानें आंतल्या गिर्यारोहकासह तो किती हजार फूट दूर जाऊन आदळेल हें सांगणें कठीण असतें.

अखेर १९५२ सालचा मे महिना उजाडला. तेन्सिंगच्या खडतर तपश्चर्येनंतर प्रकट होणाऱ्या यशःसिद्धीची प्रभा फांकण्याची वेळ येऊन ठेपली होती. स्वीस गिर्यारोहक रेमंड लँबर्ट एव्हरेस्टवर चढाई करण्यासाठीं आले. त्यांनीं तेन्सिंगला आमंत्रण दिलें.

तेन्सिंगचा आत्मविश्वास यावेळीं वाढला होता. एव्हरेस्ट आपण गांठणार असें त्याचें मन त्याला सांगत होतें. म्हणून हमाल तर नव्हेच पण मार्गदर्शक म्हणूनहि या तुकडीबरोबर जाण्यास त्यानें नकार दिला. ' आपल्या तुकडीचा सदस्य करून घेत असाल तरच मी येईन ' असें त्यानें लँबर्ट यांना सांगितलें.

लक्षावधि रुपये खर्च करून आणि अद्ययावत् सामुग्री बरोबर घेऊन लँबर्ट एव्हरेस्टवर दिग्विजयाला निघाले होते. पण तेन्सिंगच्या सहाय्याशिवाय ही सारी सामुग्री अपुरी होती हें लँबर्टनीं ओळखलें. त्यांनीं तेन्सिंगला ताबडतोब आपल्या तुकडीचा सभासद करून घेतलें. इतकेंच नव्हे तर स्वित्सर्लंडमधील अल्पाईन क्लब या गिर्यारोहक संघाचाहि त्याला सदस्य करून टाकलें. सारी तयारी झाली. ' गिर्यारोहक ' म्हणून तेन्सिंग एव्हरेस्टचा मार्ग काटूं लागला.

एव्हरेस्ट म्हणजे माणसाच्या सहनशक्तीची कसोटीच आहे. पहिला चढ संपेपर्यंत गिर्यारोहक हैराण होऊन जातो. पुढचा चढ तर याहून त्रासदायक असतो. आपल्या पाठीवर दीड दीड मणाचें ओझें लीलेनें घेऊन सहज चालणारे शेर्पा हमाल सुद्धां या चढावर आले

कीं त्यांची इतकी दमछाक होते कीं जेमतेम पांच शेर वजन घेऊन तें कष्टानें पावलें टाकूं लागतात. २४ हजार फूट संपल्यानंतर तर एव्हरेस्टचें शिखर एकाद्या कड्यासारखें भासतें. त्याचा चढ भिंती-सारखा उभा सुरू होतो.



: ऑक्सिजनची सामुग्री :

पण या रौद्र रूपानें एव्हरेस्ट तेन्सिंगला भिववूं शकत नव्हता. स्विस तुकडीच्या गिर्यारोहकांनीं ऑक्सिजनचा पुरवठा करणारी सामुग्री आपल्या बरोबर घेतली होती. तेन्सिंगला मात्र त्याची जरूर वाटत नव्हती. तो भराभर मार्ग काटीत होता. २२ हजार, २४ हजार, २६ हजार, २८ हजार अशा तऱ्हेनें तो शिखराच्या वर वर चालला होता.

●

या चढाईत तेन्सिंगची सत्त्वपरीक्षाच झाली. २७,५०० फूट चढून गेल्यावर रात्र पडली. लँबर्ट आणि तेन्सिंग यांनीं एक छोटा तंबू उभारला. वारा घोंघावत होता. झोंपणें शक्य नव्हतें. त्यांच्यापाशीं झोंपण्याची पिशवी नव्हती, उशी नव्हती. नुसतें बसावें तर अंग शेकायला स्टोव्हसुद्धां नव्हता. ते तसेच कांकडत बसले.

इतक्या उंचीवर हवा विरळ होत जाते. आणि अतिशय तहान लागते. अशा वेळीं चहाचा एक पेला उत्साहीच नव्हे तर जीवनदायी ठरतो. पण एकच काय एकामागून एक सोळा सतरा पेले चहा पोटांत रिचवला तरी तहान शमत नाहीं. पण तेन्सिंगची अवस्था याहून बिकट होती. स्टोव्ह नव्हता तर चहा कसा करणार ?

मेणबत्ती पेटवून तिच्या ज्योतीनें बर्फाचें पाणी करायचें आणि तहान शमवायची असा उपक्रम त्यांनीं चालविला. पण थंडी इतकी जबरदस्त कीं अंग गोठून गेलेंच होतें. पण रक्त गोठून प्राण जाण्याची वेळ आली. अखेर एकदां लँबर्ट यांनीं तेन्सिंगचें अंग रगडायचें, एकदां तेन्सिंगनें लँबर्टचें अंग रगडायचें असा कार्यक्रम त्यांनीं रात्रभर सुरू ठेवला. त्यामुळें अंगांत रक्त खेळत राहिलें. शेवटीं सूर्य उगवला तेव्हां ती काळरात्र संपली.

शिखरावर उंच जाऊं लागतांच हवा किती गोठवणारी असते याचें तेन्सिंगनें केलेलें वर्णन मोठें गमतीचें आहे. तो म्हणतो, "नुसती तोंडांतून थुंकी टाकली तरी गोठून तिचा दगड बनायचा आणि गोटी फेंकावी तसा तो बर्फावर घरंगळत जायचा. उच्छ्वास टाकतांना नाकपुडींतून बाहेर पडणाऱ्या वाफेचें बर्फ व्हायचें आणि तें मिशांवर अडकून बसायचें. थकवा तर इतका यायचा कीं एक मिनिटभर चालल्यानंतर पांच मिनिटें विश्रांति घेतल्याशिवाय पाऊलच पुढें पडत नसे."

२८१२६ फुटांचा विक्रम पूर्वीच झाला होता. तेन्सिगनें तो केव्हांच मागें टाकला. तो आणखी वर चढला. २८,२९० फूट गांठले गेले. यापुढें जाणें लँबर्ट यांना अशक्य वाटूं लागलें. एव्हरेस्ट आपलें भीषण स्वरूप दाखवूं लागला होता. पण तेन्सिंगला थांबण्याची इच्छा नव्हती. त्याला आणखी वर जायचें होतें. त्याला एव्हरेस्ट जिंकायचें होतें; नव्हे गांठायचें होतें.

एव्हरेस्ट कांहीं त्याचा शत्रू नव्हता; मग त्याला जिंकण्याची भाषा त्याच्या तोंडून कशी निघेल? देवतांचें मंदिर असलेल्या हिमालयाचा तो मुकुट होता. तेथें चढून तेन्सिंगला त्या मुकुटाला प्रणाम करायचा होता. ऑक्सिजनची नळी नाकाला न लावतां त्यानें २८,२९० फूट गांठले होते. त्याला तसेंच वर जायचें होतें. पण हें साहस लँबर्ट यांना मान्य नव्हतें. त्यांनीं आग्रह करून त्याला मागें नेलें. तरीहि तेन्सिंगनें आपला विक्रम प्रस्थापित केलाच होता.

## 'नेपाळ–प्रताप–वर्धक' :१२:

तेन्सिंग एव्हरेस्टवरून खालीं आला आणि त्याची कीर्ति पाश्चात्य गिर्यारोहक जगांत दुमदुमून गेली. स्वित्झर्लंडमध्यें गेल्यावर लँबर्ट यांनीं तेन्सिंगला लिहिलेल्या एका पत्रांत म्हटलें, "तूं एकदां युरोपांत येच. तूं आलास तर येथें तुझें एकाद्या विजयी वीरासारखें स्वागत होईल. कारण 'तेन्सिंग' हें नांव येथील गिर्यारोहकांत कौतुकाचा आणि अभिमानाचा विषय झाला आहे." पण उभ्या भारतांत तेन्सिंगचें कौतुक कोणीच केलें नाहीं. नेपाळच्या महाराजांना मात्र त्याच्या पराक्रमाचें मोल समजलें. पहाडांत रहाणाऱ्या त्या राजपुरुषानें त्याचा सन्मान केला. नेपाळ ही तेन्सिंगची जन्मभूमि

आहे हें स्मरण ठेवून त्यांनीं 'नेपाळ–प्रताप–वर्धक' ही पदवी आणि एक पदक तेन्सिंगला मोठ्या समारंभानें अर्पण केलें.

पण भारतीयांची रसिकता थिजलेलीच होती. या चढाईंत तेन्सिगनें जे कष्ट केले त्याचा परिणाम त्याच्या पोलादी शरीरावरहि झाल्याशिवाय राहिला नाहीं. तेन्सिंग आजारी पडला. पाटण्याच्या हॉस्पिटलमध्यें तो तीनचार महिने पडून होता. बरें वाटूं लागतांच तो दार्जिलिंगला निघाला. पण तीन महिन्यांत ज्यांनीं त्याची विचार-पूस केली नाहीं ते आतां तरी त्याची दखल थोडीच घेणार होते !

तेन्सिंग दार्जिलिंगला गेला तेव्हां त्याच्या कुटुंबानें त्याचें स्वागत केलें. शेर्पांनीं त्यांच्या या 'वाघा'चा आदरसत्कार केला. घरींहि तो अंथरुणावर पडूनच रहात असे. त्याची प्रकृति सुधारूं लागली. पण कर्तृत्ववान कीर्तिवंताला विश्रांति कुठून मिळणार ?

आक्टोबर महिना उजाडला. तेन्सिगच्या नांवाचा माग काढीत दुसरी स्वीस गिर्यारोहक तुकडी आली. डॉ. गेझिअल चेव्हली यांच्याबरोबर तेन्सिंग पुन्हां एव्हरेस्टवर निघाला. पण यावेळीं हवामान प्रतिकूल होतें. ही तुकडी जेमतेम आठ सहस्र मीटर वर चढली आणि नाइलाजानें परत फिरली. तरीहि तेन्सिगच्या कर्तृत्वाची आणि कौशल्याची छाप या गिर्यारोहकांवर पडलीच.

'आठ सहस्र मीटर उंचीवर इतर गिर्यारोहक जेथें थकून जातात, विकल होतात त्या ठिकाणींहि तेन्सिंग आश्चर्यकारक सहजतेनें आणि स्फूर्तिदायी उत्साहानें भराभर पावलें टाकीत जातो' असे उद्गार स्वीस गिर्यारोहकनेते डॉ. चेव्हली यांनीं कौतुकानें काढले आहेत.

तेन्सिग पुन्हा दार्जिलिंगला आला. २६ जानेवारी १९५३ रोजीं तुंगसुंग वस्तींत शेर्पांनीं त्याचा सत्कार करण्याचें ठरविलें. आजूबाजूचे सर्व शेर्पा जमले. पण 'सुशिक्षितां'च्या तो गांवींहि नव्हता.

१४७५८ : १३ :
७।८।५३

## चढाईला शुभशकून

मार्च महिन्याच्या सुरवातीला कर्नल हंट यांच्या नेतृत्वाखालीं ब्रिटिश तुकडी एव्हरेस्टवर चढाई करण्यास आली. त्यांनीं तेन्सिंगला बोलावलें. यावेळीं तेन्सिंगनें आणखी एक अट सांगितली. गिर्यारोहक तुकडीचा सदस्य म्हणूनच मी येईन; पण वेळ पडली तर मला एकट्याला शिखरावर जाण्याची मोकळीक असली पाहिजे; त्यावेळीं मला कोणी अडवितां कामा नये असें त्यानें सांगितलें. हंट यांनीं तें मान्य केलें.

कर्नल हंट यांनीं यावेळीं आपल्या चढाईची कडेकोट तयारी केली होती. आतांपर्यंत एव्हरेस्टवर झालेल्या चढायांतील अनुभव तेन्सिंगच्या रूपानें त्यांच्यासमोर उभा होता. वेळप्रसंगीं एकट्यानें एव्हरेस्टवर पुढें जाण्याची सवलत तेन्सिंगनें मागितली हा त्यांना शुभशकुन वाटला कीं काय कोण जाणे. पण त्यांनीं तेन्सिंगच्या गळ्यांत शुभसूचक धवल गोफ बांधला.

क. हंट यांची तुकडी १० मार्च १९५३ रोजीं काठमांडूहून पुढें चालूं लागली. ही तुकडी भक्कम होती. तिच्यामध्यें १३ 'गिर्यारोहक' होते. २० वाटाड्ये आणि ३६२ हमाल होते. तुकडीबरोबरची यंत्रसामुग्री अगदीं अद्ययावत् होती. आतांपर्यंतच्या गिर्यारोहकांच्या अनुभवाचा बारीक तपशील गोळा करण्यांत आला होता. तुकडीच्या एकंदर सामानाचें वजन दहा हजार पौंड होतें. या सर्व संरजामासह गिर्यारोहक एव्हरेस्टच्या रोखानें चालूं लागले.

क. हंट यांची तुकडी अठरा हजार फुटांवर पोंचली. या ठिकाणीं गिर्यारोहक पहिला तळ ठोकतात. पण तळामागून तळ ठोकीत ही तुकडी पुढें निघाली. २७, ३५० फूट चढून गेल्यावर कर्नल हंट यांनीं तेथें

राहून एव्हरेस्टवर अखेरची चढाई कशी करावी याची आंखणी सुरू केली.



: तें पहा विजयाचें शिखर :

ता. २५ मे रोजीं शेर्पांची एक तुकडी आणखी वर पाठविण्यांत आली. हवामानाचा अंदाज घेण्यांत येत होता. ता. २७ ची रात्र अशी भयंकर गेली कीं, गिर्यारोहकांची विजयाची आशा गारठली. बर्फाचा मारा आणि वाऱ्याचा सोसाटा यांनीं तेथें टिकून रहाणेंच अशक्य वाटूं लागलें. रात्र संपली आणि दैवाचाच जणूं उदय झाला. हवा अतिशय प्रसन्न होती. गिर्यारोहकांना हा शुभशकून वाटला. त्यांनीं आणखी वर चढाई केली. २७,९०० फुटांवर त्यांनीं नववी म्हणजे अखेरची छावणी ठोकली. तेन्सिंग आणि हिलरी ही जोडी राखीव म्हणून ठेवण्यांत आली. पुढच्या मार्गाचा अंदाज काढण्यासाठीं दोन गिर्यारोहक पाठविण्यांत आले. बर्फाची आणि मार्गाची सामान्य कल्पना घेऊनच त्यांना परतावें लागलें. आणि २९ मेचा तो शुक्रवार उजाडला.

आज हवा विशेषच बहारदार होती. क. हंट यांनीं तेन्सिंग आणि हिलरी यांना इषारा दिला. आपल्या सरंजामासह ती जोडी सज्ज झाली. तेन्सिंगनें आपला स्वीस धर्तीचा पोषाख चढविला. रेन्डीअरच्या कातड्याचे बूट घातले. ऑक्सिजनचा मुखवटा चढविला. या आणि इतर सरंजामाचें वजन ३५ पौंड होतें. बरोबर सकाळीं ६॥ वाजतां त्यांनीं नववी छावणी सोडली.



: रेन्डीअरच्या कातड्याचे बूट :

हातांतील परशूनें बर्फ कापीत आणि दोरखंडाचें एक टोंक हातांत धरीत तेन्सिंग चढत होता. दुसरें टोंक हिलरीच्या हातांत होतें. चढतां चढतां हिलरीच्या पायाखालचें बर्फ निसटलें. आतां तो पडणार इतक्यांत तेन्सिंगनें त्याला वर खेंचलें. नव्या जोमानें ते वर चढूं लागले.

त्यांनीं २८,७०० फूट तोडले होते. आतां पुढें जावें का, हा त्यांच्यापुढें प्रश्न होता. कारण प्रश्न ऑक्सिजनचा होता. ऑक्सिजन वर पोंचून पुन्हां खालीं उतरेपर्यंत पुरणें जरूर होतें. पण तशी खात्री देतां येत नव्हती तरी त्यांनीं वर चढण्याचें ठरविलें. हिलरीच्या शब्दांत सांगायचें तर त्यांनीं आयुष्याशीं जुगार खेळण्याचें ठरविलें.

तेन्सिंग आणि हिलरी २९ हजार फुटांवर आले. त्यांनीं आपल्या तोंडावरचा प्राणवायु पुरविणारा मुखवटा सांवरला आणि ते धैर्यानें एक एक पाऊल टाकूं लागले. यश त्यांच्या टप्यांत आलें होतें; पण

हातांत आलें नव्हतें. त्यांचे प्राण पायांत सांठवले गेले होते म्हणूनच त्यांचें पाऊल उचलत होतें.

२९ हजार फूट ! या उंचीवर पायांनीं चढणें हेंच मोठें दिव्य होतें. एकाद्या माणसाला पॅरॅशूटमधून अलगदपणें एवढ्या उंचीवर आणलें आणि त्याला प्राणवायूचा पुरवठा केला नाहीं तर अवघ्या ९० सेकंदांत त्याची शुद्ध जाईल ! ऑक्सिजनचा पुरवठा होत राहिला तरच कांहीं तास तो शुद्धीवर राहील. पण थंडी इतकी जबरदस्त असते, बर्फावर चमकणारा सूर्य-प्रकाश इतका झगझगीत असतो, आणि ताशीं दीडशें मैल वहाणाऱ्या वाऱ्याचा तडाखा इतका असतो, कीं शुद्धीवर राहिला तरी माणूस जगणार कसा ? वीस हजार फूट ओलांडल्यापासून जिवंत प्राणी किंवा वनस्पति यांचें दर्शनच बहुधा होत नाहीं. तेथें जीवनच नसतें.


इतक्या उंचीवर ज्या तऱ्हेचें अन्न गिर्यारोहक घेतात त्याऐवजीं नेहमींचें अन्न घेण्याची प्रबल इच्छा उत्पन्न होते. वातावरण विरळ झाल्यामुळें शारीरिक क्रिया मंदावतात. इतकेंच नव्हे तर मानसिक क्रियाहि मंदावतात. केवळ इच्छाशक्तीच्या जोरावर त्यांची पावलें उचललीं जात होतीं.

## असाध्य तें साध्य　: १५ :

११ वाजून ३० मिनिटें झालीं. तेन्सिंग आणि हिलरी एव्हरेस्टच्या माथ्यावर चढले. असाध्य तें साध्य झालें. तेन्सिंगची जीवनांतील महत्त्वाकांक्षा सफल झाली.

एव्हरेस्टचा माथा चार पांच माणसें राहूं शकतील एवढा आहे. उन्हें पडलीं होतीं; पण तीं तापदायक वाटत नव्हतीं. वारा वहात होता; पण कडेलोट करायला निघालेले ते वादळी वारे नव्हते.

तेन्सिंगनें तेथून कांचनगंगेकडे, नेपाळकडे नजर फेंकली. उत्तरेकडे तिबेटमधील रोम्बूकचा बौद्ध मठ त्याला दिसत होता.



: प्रेमळ पत्नी व लाडक्या मुली :

तेन्सिंग म्हणतो, 'शिखरावर पोंचल्यानंतर परमेश्वराचा आणि त्याच्या अगाध लीलेचा विचार प्रथम माझ्या मनांत आला. आणि दुसरा विचार माझ्या पत्नीचा आणि मुलींचा आला.'

शिखरावर पोंचण्यांत तेन्सिंगनें विश्वविजय मिळविला असला तरी त्या शिखरावर पोंचल्यानंतर त्याचें मन हर्षातिरेकानें उड्या मारणें शक्य नव्हतें. कारण खालीं परत येण्याचा प्रश्न अधिक महत्त्वाचा होता. खालीं परत जाण्याचा मार्ग उध्वस्त झाला असेल का असे विचार त्याच्या मनांत येणें सहाजिक होतें.



भारताच्या राजधानींत तेनसिंगचें भव्य स्वागत झालें. विमानतळावर (डावीकडून उजवीकडे)
कु. पेमा, श्री. तेनसिंग, नेपाळचे भारतांतील वकील, सौ. तेन्सिंग आणि श्री. सिंह

## ध्वज फडकाविले

पण अजून त्याला तेथें ध्वज फडकवावयाचे होते. हिलरीनें ब्रिटनचा, युनोचा ध्वज काढला; तेन्सिगनें नेपाळचा ध्वज हातांत घेतला, पण भारताचा ध्वज कुठें होता? होता त्याची जाहिरात झाली नव्हती. पण तेन्सिगनें गुपचुप आपल्या पोटाशीं बाळगून तो शिखरावर आणला होता. तेन्सिग भारताचा नागरीक असल्यानें त्या ध्वजाचा त्याला अभिमान होता.

हे ध्वज त्या परशूवर उभारण्यांत आले. एव्हरेस्टवर वहाणाऱ्या वाऱ्यावर ते फडफडूं लागतांच हिलरीनें त्यांचें छायाचित्र घेतलें. आतां ते खालीं परतण्यास मोकळे झाले होते. पण पांच मिनिटें विश्रांति घेण्यासाठीं ते थांबले. तेन्सिगनें मिंट केक चघळले आणि ते खालीं उतरूं लागले. स्वर्गमाथ्यावर हे वीर पंधरा मिनिटें होते.

एकेक तळ खालीं उतरत ३० जून रोजीं २१ हजार फुटांवर असलेल्या तळावर ते क. हंट यांना भेटले आणि आपल्या विजयाची वार्ता त्यांनीं हंट यांना सांगितली. आतां ते संकटांतून पार पडले होते. एव्हरेस्टवर जाण्यांत मिळविलेल्या यशाचा खरा आनंद त्यांना आतां झाला.

## 'नेपाळतारा'

क. हंट यांच्या तुकडीबरोबर तेन्सिग हिमालयावरून खालीं उतरूं लागला तसतशी त्याची कीर्ति जगांत वरवर चढत होती. त्याच्यावर अभिनंदनाचा पाऊस पडत होता; त्याच्या कौतुकाला पारावार उरला नव्हता.

नेपाळला तेन्सिगबद्दल विशेष आपुलकी वाटत होती. त्याच्या



राष्ट्रपति डॉ. **राजेंद्रप्रसाद** यांनीं श्री. **शेर्पा तेनसिंग** यांना सुवर्णपदक देऊन त्यांच्या शौर्याचा सत्कार केला.

१२१७६३५
७।८।५३

गुणाचें कौतुक प्रथम नेपाळनेंच केलें होतें. त्यामुळें नेपाळचा तेन्सिंगवर हक्कच आहे. ता. २० जून रोजीं आपल्या सहकारी गिर्यारोहकांसह तेन्सिंग काठमांडूंत आला. राष्ट्र-वीराप्रमाणें त्याचें स्वागत झालें. नेपाळच्या महाराजांनीं त्याला ‘नेपाळ तारा’ ही बहुमानाची पदवी दिली; दहा हजार रुपयांची थैली दिली.

तेन्सिंग कलकत्त्यांत आला. तेथेंहि त्याचें प्रचंड स्वागत झालें. तो बंगालचा रहिवासी असल्यामुळें हें स्वागत विशेष जोरदार होतें. प. बंगाल सरकारनें घर बांधण्यासाठीं तेन्सिंगला दार्जिलिंगमध्यें जमीन दिल्याचें जाहीर केलें. तेथें तेन्सिंगच्या नेतृत्वाखालीं एक गिर्यारोहक क्लब स्थापन करण्याचेंहि प. बंगाल सरकारनें ठरविलें आहे.

कलकत्त्याच्या ‘स्टेट्स्मन’ पत्रानें आपल्या वाचकांकडून १२ हजार रुपये तेन्सिंगला घर बांधण्यासाठीं अर्पण केले. कलकत्ता नगरपालिकेनेंहि त्याचा सत्कार केला.

तेन्सिंग दिल्लीला आल्यावर त्याचें असेंच प्रचंड स्वागत झालें. राष्ट्राध्यक्षांनीं त्याला एक खास पदक अर्पण केलें. तेन्सिंगच्या जीवनाचा मूलमंत्रच त्या पदकावर ‘साहसे श्री प्रतिवसति’ हा कोरलेला आहे.

तेन्सिंग आपल्या ब्रिटिश सहकाऱ्यांसह इंग्लंडला गेला असून ब्रिटिश राणीतर्फे त्याला ‘जॉर्ज पदक’ देण्यांत आलें आहे. गुणग्राही पाश्चात्य राष्ट्रांतून त्याला आणखी अनेक आमंत्रणें येत आहेत.

## नम्र आणि दिलदार

तेन्सिंगवर गौरवाचा आणि देणग्यांचा वर्षाव होत असला तरी त्याची जन्मजात नम्रता ढळलेली नाहीं. त्याच्या हास्यमुख चेहऱ्यावर अहंकाराची छटा उमटलेली नाहीं. जगांतील सर्वोच्च शिखरावर



ता. २९ जून रोजीं राष्ट्राध्यक्ष डॉ. **राजेंद्रप्रसाद** यांनीं राष्ट्रपतिभवनांत विजयी गिर्यारोहकांना सुवर्णपदकें दिलीं.

पहिल्यानें पदार्पण करूनहि आपल्या या यशाचें श्रेय त्यानें क. हंट यांच्या नेतृत्वाला, पूर्वींच्या गिर्यारोहकांच्या प्रयत्नांना दिलें आहे. इतकेंच नव्हे तर आपल्या सहकाऱ्याला निष्कारण कमीपणा दिला जाऊं नये म्हणून 'आम्हीं दोघे जवळ जवळ एकदमच शिखरावर चढलों' या हिलरीच्या निवेदनाला त्यानें मान्यता दिली आहे. त्याच्या दिलदारपणाची आणि खिलाडूपणाची साक्ष पटविण्यास ही गोष्ट पुरेशी आहे.

तेन्सिंग पैशाचा लोभी नाहीं. ध्येयासाठीं त्यानें अपार कष्ट सोसले. 'माझ्या पतीच्या महत्त्वाकांक्षेसाठीं मी खुशीनें दारिद्र्य पत्करलें' असें उद्गार त्याच्या पत्नीनेंच काढले आहेत. तेन्सिंगच्या निर्लोभीपणाची आणि धैर्यनिष्ठेची ग्वाही १९४७ सालीं आपला सहकारी म्हणून त्याला एव्हरेस्टवर नेणाऱ्या अर्ल डेनमन या गिर्यारोहकानें दिली आहे. 'त्यावेळीं माझी आर्थिक स्थिति विकट होती. तरीहि तेन्सिंग माझ्या बरोबर आला. माझे पैसे त्यानें अतिशय काटकसरीनें खर्च केले' असे उद्गार त्यानें काढले आहेत.

## स्वाभिमानी स्फुलिंग : १९ :

पण या विनम्र तेन्सिगचा स्वाभिमान जळजळीत आहे. 'त्याच्या अनुभवाच्या मर्यादेंत तेन्सिग चांगला गिर्यारोहक आहे' असे 'साहेबी' उद्गार क. हंटनीं काढल्याचें कळतांच त्याच्या या स्वाभिमानाचा चटका खुद्द हंटना जाणवल्याशिवाय राहला नाहीं.

या बौद्धधर्मीय गिर्यारोहकाला नेपाळी, हिंदी, पुश्तु, चित्रळी, तिबेटी अशा पांच भाषा येतात. इतकेंच नव्हे तर सहवासानें त्याला आतां इंग्रजीहि समजतें. तथापि, आपल्याला शिक्षण मिळालें नाहीं याची व्यथा त्याच्या मनांत खोल दडलेली आहे. म्हणूनच कष्टाच्या



एव्हरेस्ट जिंकणाऱ्या गिर्यारोहकांचें पं. नेहरूंनी ता. २८ जून १९५३ रोजीं आपल्या घरीं स्वागत केलें.
डावीकडून उजवीकडे : **कर्नल सर जॉन हण्ट** (पथकाचे पुढारी), **सर एडमंड हिलारी, पं. नेहरू** व **श्री. तेनसिंग**

संसारांतहि आपल्या मुलींना अद्यावत् शिक्षण देण्याचा त्यानें सतत प्रयत्न केला.

## तेन्सिंगचें भारत-प्रेम : २० :

तेन्सिंगची भारताविषयींची निष्ठा कौतुकास्पद आहे. तेन्सिंग भारतीय आहे हें त्याच्या अभिनंदनाची तार पाठविणाऱ्या मंत्री महाशय मौलाना आझादांनाहि माहीत नव्हतें. इतकीं वर्षें त्यानें कष्ट सोसले आणि इतके विजय मिळविले पण त्याची दखल कोणी घेतली नव्हती. पण तेन्सिंगनें मात्र भारतीय ध्वज गुप्तपणें एव्हरेस्टवर नेला होता !


तेन्सिंगनें सर्वश्रेष्ठ विजय मिळविला आहे. तो जगत्-श्रेष्ठ गिर्यारोहक झाला आहे. यापुढें तो काय करणार ? 'यापुढें त्यानें गिर्यारोहण करूं नये' असें मत त्याच्या पत्नीनें प्रगट केलें आहे आणि तें तिच्या पति-प्रेमाला साजेसेंच आहे. दार्जिलिंगला गिर्यारोहक क्लब स्थापन करण्याचें ठरवून प. बंगाल सरकारनें तेन्सिंगला योग्य कार्यक्षेत्र निर्माण करून दिलें आहे.

## पराक्रमाची स्फूर्ति : २१ :

सुप्रसिद्ध गिर्यारोहक एरिक शिप्टन लिहितात:—एव्हरेस्ट जिंकल्या-नंतर गिर्यारोहकांना जिंकण्यासारखें आतां कांहीं राहिलें नाहीं असें कोणी समजूं नये. एव्हरेस्टच्या कमाल उंचीमुळें आतांपर्यंत प्रत्येकजण त्याच्या-कडे मोर्चा वळवीत होता. पण एव्हरेस्टपेक्षांहि खडतर अशीं अनेक शिखरें हिमालयांत अजूनहि गिर्यारोहकांना आव्हान देत आहेत.

तेन्सिंगच्या पराक्रमापासून स्फूर्ति घेऊन त्याच्या भावी शिष्यांनीं हीं आव्हानें स्वीकारलीं पाहिजेत.

●



विजयी गिर्यारोहकांनीं राजघाटावर राष्ट्रपित्याच्या समाधीवर पुष्पहार अर्पण करून श्रद्धांजलि वाहिली.



काठमांडूला विजयी पतीचें स्वागत करण्यासाठीं अधीर झालेली सौ. **अंगलाहम्**
व त्यांच्या दोन लाडक्या कन्या **पमा** आणि **निमा**